महा मेट्रो

PUNE METRO

# Traffic Diversion at Shivajinagar

**Date: 10.07.2020**

The traffic in places around the Shivajinagar bus terminal and railway station will be diverted to facilitate the ongoing metro work. The diversion in traffic has been planned such that no inconvenience and disturbance is caused to the vehicular traffic. Maha Metro requests wholehearted cooperation as has always been extended by one and all.

**Present traffic on Shivaji Raod:**
The traffic coming from Barve Chowk to Shimla office chowk and towards Shivajinagar ST Stand, Narveer Tanaji Wadi, Irani Basti & Shivajinagar railway station (West side) is temporary closed.

**Alternative Route on shivaji Raod:**
The traffic coming Barve Chowk to Shimla Office has to take left turn on Shimla office chowk towards Chafekar chowk and take right turn from Agriculture college flyover towards Sakhar Sankul , Narveer Tanaji Wadi raod & Handicraft Corporation then.

A) Traffic take a U turn and turn left from Pride Hotel colony and go via Dalvi hospital to Narveer Tanaji wadi, Irani Colony.

B) Traffic take left from Shimala office chowk to All India Radio, Centurion Hotel, ST stand, Railway Station (West side) of the next desired locations.

आदेश

जा.क्र.अपोआ/वाहतुक/ ४५०७ /२०२० पुणे शहर दिनांकः- ३ /०७/२०२०

पुणे शहरातील शिवाजीनगर वाहतूक विभागाच्या हद्दीत शिवाजीनगर एस. टी. स्टॅण्ड याठिकाणी महामेट्रो स्टेशनचे बांधकाम सुरु आहे. तरी सदर कामाकरिता दिनांक- ४-७-२०२० पासून पुढील आदेशापर्यंत प्रायोगिक तत्वावर वाहतुकीत बदल करणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७-९-१९९६ च्या नोटीफिकेशननुसार, तसेच मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन, मी डॉ. संजय शिंदे, अपर पोलिस आयुक्त, वाहतूक, पुणे शहर, त्या अनुषंगाने शिवाजीनगर वाहतूक विभागातील वाहतुकीत खालीलप्रमाणे तात्पुरते बदल करीत आहे.

- **शिवाजी रस्त्याने स. गो. बर्वे चौकाकडून सिमला ऑफिस चौकात येणारी वाहतूक ही सिमला चौकातून पुढे सरळ शिवाजीनगर एस. टी. स्टॅण्ड, नरवीर तानाजी वाडी व इराणी वस्ती, शिवाजीनगर रेल्वे स्टेशनकडे जाण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात येत आहे.**
- **पर्यायी मार्ग :– स. गो. बर्वे चौक ते सिमला ऑफीस चौकातून नरवीर तानाजी वाडीकडे जाणारी शिवाजी रस्त्यावरील वाहतूक आता सिमला ऑफीस चौकातून डावीकडे वळून चापेकर चौकातून जाईल व उड्डाणपुलाखालून उजवीकडे वळून हातकागद संस्था, साखर संकुल, नरवीर तानाजी वाडीकडे जाईल.**
- **किंवा यू टर्न घेऊन प्राईड हॉटेल गल्लीत डावीकडे वळून दळवी हॉस्पीटल मार्गे नरवीर तानाजी वाडीकडे किंवा इराणी वस्तीकडे जाईल.**

**किंवा सिमला ऑफिस चौकात डावीकडे वळून आकाशवाणी, सेंच्युरियन हॉटेल, शिवाजीनगर एस.टी स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन (पश्चिम बाजु) अथवा पुढील इच्छित स्थळी जाईल.**

तरी वरीलप्रमाणे वाहतूक बदलाबाबत वाहतूक पोलिसांना सहकार्य द्यावे असे आवाहन पुणे शहर वाहतूक शाखेकडून करण्यात येत आहे.

(डॉ. संजय शिंदे)
अपर पोलिस आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर.